प्रयत्न अयशस्वी ठरला. मुळात खिलाफत चळवळीला तुर्कस्थानातही फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. सन १९२२ मध्ये तुर्कस्थानात कमालपाशाने खिलाफत पद नष्ट केले आणि तुर्कस्थान हे आधुनिक राष्ट्र बनविले. अशा कालबाह्य खिलाफतसाठी असहकार चळवळीचा वापर झाला. तो शेवटी अपयशास कारणीभूत ठरला. मुस्लिम समाज राष्ट्रीय आंदोलनात मनापासून कधीच सामील झाला नाही. हे असहकार चळवळीचे अपयशच होते.

सारांश, असहकार आंदोलन काही प्रमाणात अपयशी झाले, काही प्रमाणात यशस्वी झाले. त्याचे परिणाम मात्र दुरगामी झाले. ते पुढील स्वातंत्र्य चळवळीला उपयुक्त ठरले.

## स्वराज्य पक्षाची राष्ट्रीय चळवळीतील कामगिरी :-

गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्यामुळे राष्ट्रीय काँग्रेसपुढे कोणताच भरीव कार्यक्रम उरला नव्हता. त्याचवेळी गांधीजींना अटक होऊन ६ वर्षांची शिक्षा झाल्यामुळे राष्ट्रीय काँग्रेसला कोणी मार्गदर्शकही उरला नव्हता. पक्षात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. त्यामुळे देशात असमाधान व नैराश्य पसरले होते. शिवाय ह्या काळात अनेक ठिकाणी हिंदू व मुस्लिम यांच्यात दंगे घडून आले. राष्ट्रीय आंदोलनात निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्यासाठी स्वराज्य पक्ष पुढे झाला. १९१९ च्या कायद्याबाबत काँग्रेसने असहकाराचे धोरण जाहीर केले होते. तरीहा या कायद्यान्वये मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन निवडणुका लढवाव्यात, त्यायोगे जनतेत राजकीय जागृती घडवूम आणावी, कायदेमंडळात प्रवेश करून सरकारची अडवणूक करावी, सरकारवर दडपण आणून लोकहिताचे कायदे पास करून घ्यावेत व या मार्गाने राष्ट्रीय चळवळ जिवंत ठेवावी या उद्देशाने काँग्रेसमधील बऱ्याच लोकांचा विरोध असतानाही चित्तरंजन दास, पंडित मोतीलाल नेहरू, न. चि. केळकर, बॅ. जयकर व मुंजे इत्यादी नेत्यांनी सन १९२३ मध्ये स्वराज्य पक्षाची स्थापना केली.

'साम्राज्यांतर्गत वसाहतीचे स्वराज्य' हे स्वराज्य पक्षाचे ध्येय होते. या ध्येयानुसार कार्यप्रवृत्त राहून सर्वसामान्य लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न या पक्षाने केला. दैनंदिन जीवनात गुरफटलेल्या समाजाला राजकीय हालचालीकडे आकर्षित करण्याचे कार्य या पक्षाने केले. सन १९२३ मध्ये होणाऱ्या निवडणुकात निवडून येण्यासाठी या पक्षाने प्रचाराचा धुमधडाका सुरू केला. त्यामुळे राजकीय जागृती होऊन स्वराज्य पक्षाला बऱ्यापैकी यश मिळाले. केंद्रीय कायदेमंडळाच्या १०४ निर्वाचित जागांपैकी स्वराज्य पक्षाला ४५ जागा मिळाल्या. निवडून आल्यानंतर स्वराज्य पक्षाने केंद्रीय कायदेमंडळात बॅ. जीनांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र गटाशी हातमिळवणी करून 'नॅशनॅलिस्ट पार्टी' हा नवीन पक्ष स्थापन करून कायदेमंडळात सरकारची सतत अडवणूक केली. तसेच स्वराज्यवाद्यांनी सरकारच्या जुलमी धोरणावर कठोर टीका करून सरकारी धोरणाचे वाभाडे काढले. लोकहितासाठी सभागृहात स्वराज्यवाद्यांनी ठराव मांडून त्यावर चर्चा घडवून आणल्या. अनेक जुलमी कायदे रद्द करण्यास सरकारला भाग पाडले. तसेच सरकारच्या जनविरोधी धोरणाला स्वराज्यवाद्यांनी सतत विरोध केला. भारताला जबाबदार राज्यपद्धती द्यावी या मागणीचा स्वराज्य पक्षाने सतत पाठपुरावा केला. त्यामुळे निदान प्रांतात तरी भारतीयांना जबाबदार राज्यपद्धती

Scanned by CamScanner

देण्याचा सरकारला विचार करावा लागला. पुढे त्यातूनच सरकारला सायमन कमिशन नियुक्त करावे लागले. परंतु हळूहळू या पक्षाच्या कार्यात शिथिलता येऊ लागली. चित्तरंजन दास यांच्या मृत्यूनंतर (१९२५) स्वराज्य पक्षात फूट पडण्यास सुरुवात झाली. सन १९२६ मध्ये तर स्वराज्य पक्ष नामशेष झाला.

## सामयन कमिशनवरील बहिष्काराची चळवळ :-

स्वराज्य पक्षाच्या अस्तानंतर जनतेतील स्वातंत्र्यासंबंधीचा उत्साह कायम राहील असा कोणताही कार्यक्रम राष्ट्रासमोर नव्हता. परंतु याचवेळी ब्रिटिश सरकारने एक मोठी चूक केली. ही चूक म्हणजे सर्व इंग्रज सदस्य असलेल्या सायमन कमिशनची नेमणूक होय. ब्रिटिशांच्या या चुकीमुळे भारतातील राजकीय नेत्यांना पुन्हा राष्ट्रव्यापी आंदोलन सुरू करण्याची संधी मिळाली.

सन १९१९ च्या कायद्यात असे एक कलम होते की, “१९१९ च्या कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे, तसेच भारतात जबाबदार शासनपद्धती स्थापन करण्याच्या दृष्टीने कितपत प्रगती झाली आहे याचा अंदाज घेण्यासाठी दर १० वर्षांनी एक वैधानिक आयोग नेमण्यात यावा.” या कलमाला अनुसरुन वास्तविक सन १९२९ मध्ये कमिशन नेमले जाणार होते. परंतु त्या अगोदर दोन वर्षे सायमन कमिशनची नेमणूक करण्यात आली. ब्रिटिश संसदेच्या सात सदस्यांचे हे कमिशन सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखाली नियुक्त करण्यात आले.

कमिशनची नियुक्ती २ वर्षे अगोदर करण्यात आली याबद्दल भारतीय जनतेची कोणतीच तक्रार नव्हती. परंतु कमिशनच्या नेमणुकीमुळे भारतीय जनता असंतुष्ट झाली. याचे मुख्य कारण म्हणजे या कमिशनमधील सातही सदस्य इंग्रज होते व या गोऱ्या लोकांकडून भारताला भावी सुधारणा देण्यासंबंधी शिफारशी केल्या जाणार होत्या. ब्रिटिशांना हिंदी लोकांच्या सहकार्याची गरज नाही हेच यावरून सिद्ध होत होते. असे हे बिगर हिंदी सभासदांचे कमिशन जागृत झालेल्या हिंदुस्थानातील राजकीय नेत्यांना स्वीकारार्ह वाटत नव्हते. म्हणून डिसेंबर १९२७ मध्ये मद्रास येथे एम्.ए. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेस अधिवेशनात सायमन कमिशनच्या कामकाजावर "At every stage, every where and in every form" या शब्दात बहिष्कार घालण्याचा ठराव संमत झाला. या ठरावाच्या अनुरोधाने साममन कमिशन ज्या दिवशी हिंदुस्थानात येणार होते, त्या दिवशी म्हणजे ३ फेब्रुवारी १९२८ रोजी मुंबईत जनतेने काळी निशाणे दाखवून ‘सायमन परत जा’ (Simon, Go Back) अशा घोषणा करीत कमिशनचे स्वागत केले. राजकीय संघटनांनी शहरात कडकडीत हरताळ पाळला. त्याचप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी कमिशन भेटीस गेले, त्या त्या ठिकाणी हरताळ पाळून मिरवणुका काढण्यात आल्या व ‘सायमन परत जा’ अशा घोषणा देण्यात आल्या. सायमन कमिशनवरील बहिष्काराची चळवळ दडपून टाकण्याकरिता सरकारने दडपशाहीचे सत्र सुरू केले. लाहोरमध्ये कमिशनविरोधी निघालेल्या मिरवणुकीवर पोलिसांनी बेबंद लाठीमार केला. त्यात मिरवणुकीचे नेतृत्व करणारे धाडसी नेते लाला लजपतराय पोलिसांच्या लाठीमाराने जबर जखमी झाले व पुढे त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

Scanned by CamScanner